एका रम्य वेळी, चौपाटीवरी...( मेरे सामनेवाले, खिडकीमे.)








एका रम्य वेळी, चौपाटीवरी,  माझी स्वप्नपरी, मजला दिसली,
वैताग असा, की ती चिकणी,  माझ्या मित्रावरी, कां हो भुलली,

तुम्हा काय हो वर्णू, ब्यूटी तिची,  दिसते एकदम, ती माधूरी
ऐश्वर्या ती जणू , हसताना,  तिच्या गाली पडते, गोड खळी
डोळ्यात तिच्या, एक जादू अशी, झाली खलास हो, माझी कलेजी
एका रम्य वेळी, चौपाटीवरी.....

जरी गुलाब, पाठवतो मी तिला,   ती शोधते हो, माझ्या मित्राला
देवा टक्कल पाड, त्या भम्पकला , थोडासा चकणा , करना त्याला
स्वप्नात तिच्या, मग जाऊन तू, ' किती स्मार्ट मी आहे ', पटव तिला
एका रम्य वेळी, चौपाटीवरी.....

ऐकेल जरूर, ती तुझे देवा ,  देईल डच्चू, त्या ठोकळ्याला
प्रेमात पडेल, नक्की माझ्या,  येईल चौपाटी,  भेटाया
मिठीत तिच्या ,सांगेल मला,  'गडे जाऊया ना, पिक्चरला '
एका रम्य वेळी, चौपाटीवरी.........

सुहास पै

पुढे चालू............
(ON PAGE 2)

*(भगवान की कृपासे, मित्रको टक्कल पडनेके बाद. ...)*

रोज संध्याकाळी, चौपाटीवरी, मज भेटते, माझी स्वप्नपरी
मी खूष बघा, की ती चिकणी, आता भुलली, आहे माझ्यावरी

सुहास पै

*ताजा कलम...*

***खास 'गोड गळ्याच्या' लोकांसाठी, ह्या गाण्याची केरीओकी.. 'स्वप्नपरी ', ह्या अंकाच्या 'कर्णमाधुरी' (karaoke) सेक्शन मध्ये उपलब्ध आहे. त्याचा जरूर लाभ घ्यावा . जमल्यास आपण आपल्या सुरेल आवाजात हे गाणे रेकार्ड करून त्याची audio file आम्हाला पाठवा.***